दिनांक: ३०.१२.२०१७

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाच्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीतील कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी

### संदर्भ:- महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०७(Jun)/२०१७

महानिर्मिती कंपनीतर्फे सरळसेवा जाहिरात क्र.०७(Jun)/२०१७ अन्वये निम्नस्तर लिपीक (मासं) व निम्नस्तर लिपीक (लेखा) या रिक्त पदांकरीता सरळसेवेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांस अनुसरुन तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या रिक्त पदांच्या अनुषंगाने आणि सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा सूची यादीतील उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी दि.२८.१२.२०१७ रोजी पार पाडण्यात आलेली आहे.

करीता, कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि.२८.१२.२०१७ रोजी पूर्वी प्राप्त केलेली व कागदपत्रे पडताळणी दिवशी म्हणजेच दि.२८.१२.२०१७ रोजी वैध असलेली असणे आवश्यक होते. तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्रणालीद्धारे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत धारण केलेला असणे आवश्यक होते. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे ऑनलाईन प्रणालीद्धारे अर्ज सादर करताना अर्जात भरलेली माहिती सिध्द करण्याच्या अनुषंगाने पात्र आढळून येणाऱ्या व आवश्यक कागदपत्रांअभावी अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

उमेदवारांनी पात्र व अपात्र करण्यात आल्याबाबतची कारणे प्राप्त करुन घेण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

१) **निम्नस्तर लिपीक (मासं) :-**

अ) **पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.** ↵

ब) **अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.** ↵

२) **निम्नस्तर लिपीक (लेखा) :-**

अ) **पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.** ↵

ब) **अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.** ↵

<u>टिप</u> :-

१) कागदपत्रे पडताळणी अंती पात्र आढळून येणाऱ्या पात्र उमेदवारांच्या यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही. सदर पात्र व अपात्र उमेदवारांची यादी पूर्णतः जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

२) कागदपत्रे पडताळणीअंती पात्र व अपात्र आढळून येणाऱ्या उमेदवारांची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती